सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
अधिदान व लेखा कार्यालय

☎ ०२२ २६५६६३००, E-mail :pao@mahakosh.in लेखा कोष भवन,ए विंग वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे (पूर्व),मुंबई -४०००५१

क्र.अले/आस्था/अ/मार्च अल्पोपहार/ 396/2024 दि. 13 DEC 2024

-: दरपत्रक सूचना :-

अधिदान व लेखा कार्यालयातील वांद्रे (पु) व चर्चगेट येथील अधिकारी / कर्मचारी वर्गाला दि.२९.०३.२०२५, दि.३०.०३.२०२५ व दि.३१.०३.२०२५ रोजी खालीलप्रमाणे अल्पोपहार (नाश्ता, चहा/कॉफी) व रात्रीचे जेवण पुरविणेबाबत दरपत्रके मागविण्यात येत आहे.

दिनांक	खाद्यपदार्थाचे प्रकार	पुरवठा करण्याची वेळ	पुरवठा करावयाचे नग
२९.०३.२०२५	उपमा चहा = १ वेळा कॉफी =१ वेळा	सायंकाळी ४.०० वाजता	३५० प्लेट १७५ कप चहा १७५ कप कॉफी
३०.०३.२०२५	बटाटा वडा चहा = १ वेळा कॉफी =१ वेळा	सायंकाळी ४.०० वाजता	३५० प्लेट १७५ कप चहा १७५ कप कॉफी
३१.०३.२०२५	इडली सांबर चहा = १ वेळा कॉफी =१ वेळा	सायंकाळी ४.०० वाजता	३५० प्लेट १७५ कप चहा १७५ कप कॉफी
३१.०३.२०२५	**जेवण (शाकाहारी जेवण)** :	रात्री ८.०० वाजता	३५० थाळी

(रात्री)	मटर पनीर MIX VEG भाजी जिरा राईस, डाळ तढका, पुरी आणि चपाती कटलेट, बटाटा भजी आणि मिरची भजी सिताफळ बासुंदी, कोशिंबीर/ बुंदी रायता लोणचे, पापड, चटणी (जेवणानंतर ICECREAM)		

दरपत्रकासंबंधी अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

१. पुरवठाधारकांनी अन्न, औषध प्रशासन यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
२. पुरवठाधारकांनी वस्तु व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
३. पुरवठाधारकांनी त्यांच्या/संस्थेच्या PAN card ची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक.
४. उपरोक्त नमूद खाद्यपदार्थ सुस्थितीत, ताजे तसेच कर्मचाऱ्यांना नाश्ता, चहा/कॉफी त्यांच्या बैठकीच्या जागेवरच पुरविण्याची जबाबदारी पुरवठा धारकांची राहील.
५. वरील नमुद संख्येत कमी/जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच उपरोक्त दिनांका व्यतिरिक्त इतर दिवशी कार्यालय चालु राहण्याची शक्यता गृहित धरून नाश्ता, चहा/कॉफी पुरविण्याबाबत कळविण्यात आल्यास दरपत्रकातील नमुद दरानेच पुरवठा करावा लागेल.
६. उपरोक्त दिनांकामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
७. उपरोक्त दरपत्रके स्विकारण्याचे व नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे कडे राहतील.

तरी आपली दरपत्रके अधिदान व लेखा कार्यालय (आस्थापना शाखा), दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ येथे दिनांक १३.१२.२०२४ ते दिनांक २०.१२.२०२४ या कालावधीत संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यात सादर करावीत. तसेच दरपत्रके दिनांक २३.१२.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता उपरोक्त नमूद ठिकाणी उपस्थित असलेल्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

12/12/24.

(वि.ग.गांगुर्डे)
अधिदान व लेखा अधिकारी